Form : 3-A

फिर्यादी प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** मुखेड

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0309 **Year (वर्ष):** 2026

Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ): 02/09/2026 23:37

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7
2	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	12

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिंनाक पासून):** 02/09/2026

Time Period (कालावधी): पहर 5 **Date To (दिंनाक पर्यंत):** 02/09/2026

Time From (वेळेपासून): 12:30 बजे

Time To (वेळेपर्यंत): 13:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

Date (दिंनाक): 02/09/2026 **Time (वेळ):** 23:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ):**

Entry No. (नोंद क्र.): 049

Date & Time (दिंनाक आणि वेळ): 02/09/2026 23:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उप अधी,भूमी अभिलेख कार्यालय, मूखेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): माधूरी अजयराव यावलीकर

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : अजयराव

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	ला प्र वि कार्यलिय नांदेड ,नांदेड ,मुखेड,नांदेड,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	ला प्र वि कार्यलिय नांदेड ,नांदेड ,मुखेड,नांदेड,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-8379089710

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	विवेकानंद पांडूरंग खुडे			1. मुपा◌ खुडेवाडी,कंधार ,मुखेड, नांदेड,महाराष्ट्र,भारत
2	सय्यद इमरान सय्यद इकबाल			1. पिरबूर्हान नगर ,नांदेड ,मुखेड, नांदेड,महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
1	नाणे आणि चलन	भारतीय- रुपया	500 रू दराचे 30 नोटा असे	15,000.00

Scanned with OKEN Scanner

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
			एकूण 15000	

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

15,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत):**

फिंयाद
दिंनाक 02/09/2026
मी माधूरी अजयराव यावलीकर, वय 38 वर्ष, व्यवसाय: नोकरी, पद: पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नादेंड मोबाईल क्रमांक 8379089710
सरकार तर्फे फिंयादी होवून फिंयाद देते की, मी वरील ठिकाणी सन 2024 रोजी पासून पोलीस निरीक्षक या पदावर नेमणूकीस आहे.
आम्ही दिंनाक 01/09/2026 रोजी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नांदेड युनिट कार्यालयात हजर असतांना प्रभारी अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री राहूल तरकसे साहेब, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नांदेड यांनी त्यांचे कक्षात बोलावून कळविले की, तक्रारदार सुर्यकांत रामचंद्र इंद्राळे, वय: 72 वर्ष, व्यवसाय: सेवानिवृत्त ग्रंथालय सहायक, तत्कालीन नेमणूक: महात्मा ज्योतीबा फुले, महाविद्यालय, मुखेड, रा. वेताळ गल्ली, मुखेड यांची लोकसेवका विरूध्द लाच मागणी बाबतची तक्रार नोंदवुन पुढील कारवाई करणे बाबत तोंडी आदेषीत दिले. त्यानंतर आम्ही मुळ तक्रारदार सुर्यकांत इंद्राळे यांना आमचे कक्षात नेवून विचारपुस केली असता, त्यावर त्यांनी आम्हास सांगितले की, माझे पत्नी सरूबाई इंद्राळे यांचे नावे मौ. मुखेड येथे गट क्रमांक 61 मध्ये 53 आर षेतजमीन आहे. नमुद षेतजमीनीची मोजणी करण्यासाठी मी बरेच दिवसापुर्वी कोर्टात अर्ज दाखल केला होता. त्यावर मा. कोर्टाचा आदेष झाल्याने मी, भुमी अभिलेख कार्यालय, मुखेड येथे जावून तेथील खुडे साहेबाकडे माझे षेतजमीनीची मोजणी करणेकरीता कोर्ट कमिषन मोजणी फिस म्हणून 12,000/- रूपये दिंनाक 16/04/2026 रोजी भरणा केली.
त्यावरून मुखेड येथील भुमी अभिलेख कार्यालयातील खुडे यांनी मला दिंनाक 25/06/2026 रोजी माझे षेतजमीन मोजणी बाबतची नोटीस दिली होती. नमुद नोटीस मध्ये माझे षेतजमीनीची मोजणी दिंनाक 06/07/2026 रोजीची तारीख दिली होती.
दिंनाक 06/07/2026 रोजी षेत मोजणी करीता भुमी अभिलेख कार्यालय, मुखेड येथून सय्यद इमरान सय्यद इकबाल व त्यांचे सोबत खुडे असे दोन साहेब माझे षेतात येवून षेतजमीनीची मोजणी केली. त्यानंतर मला दोघापैकी खुडे साहेबांनी बाजूला घेवून सांगितले की, तुमच्या षेताची मोजणी केली असून मोजणीचा अहवाल मा. न्यायालयात पाठविण्यासाठी साहेबांना पैसे द्यावे लागतात, त्यावर मी त्यांना विंनती केली की, सध्या माझेकडे पैसे नाहीत. तेव्हा ते दोघेजण तेथून निघून गेले.
दिंनाक 31/08/2026 रोजी मी पुन्हा भुमी अभिलेख कार्यालय, मुखेड येथे जावून खुडे साहेबांची भेट घेवून विचारणा केली की, साहेब माझे षेत मोजणीचा अहवाल पाठविले का ? त्यावर त्यांनी मला सांगितले की, तुम्ही त्या दिवषी पैसे दिले नाही, त्यामुळे तुमचा अहवाल पाठविण्यात आलेला नाही. तुम्ही 15,000/- द्या, तेव्हा आम्ही पुढील कारवाई करू आणि साहेबाला पैसे दिल्याषिवाय तुमचे काम होणार नाही. त्यावेळी मी नाईलाजास्तव माझे षेत मोजणीचे पुढील काम होणार नाही म्हणून होकार देवून तेथून निघून आलो आहे. तरी त्यांचे विरूध्द योग्य ती कारवाई करावी अषा आषयाची तक्रार दिली होती.
प्राप्त तक्रारी वरून आम्ही दिंनाक 01/09/2026 रोजी गोपनीय कामाकरीता नांदेड वाघाळा षहर महानगरपालीका नांदेड यांना लेखी पत्र देवून तेथील दोन षासकीय पंच 1) विरेनकुमार कैलास धनमने, वय 26 वर्ष, व्यवसाय

Scanned with OKEN Scanner

नौकरी, पद लेखा लिपीक, व पंच क्रमांक 2) मोहम्मद इम्रान अब्दुल गफार, वय 30 वर्श, व्यवसाय नौकरी, पद औशध र्निमाता, असे पंच कर्मचारी उपलब्ध करून घेतले. त्यानंतर नमुद दोन्ही पंचाना उदईक रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई करण्यात येणार असल्याचे कळवून त्यांना घरी जाण्याची परवानगी दिली.
आम्ही दिंनाक 01/09/2026 रोजी दिलेल्या सुचने वरून आज दिंनाक 02/09/2026 रोजी आमच्या कक्षात तक्रारदार, सापळा पथक व दोन्ही पंच हजर आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारणा केली की, लोकसेवक खुडे व लोकसेवक सय्यद इम्रान हे कुठे भेटतील, तेव्हा त्यांनी कळविले की, ते दोघेजण मुखेड येथील तहसिल कार्यालयचे आत असलेले भुमी अभिलेख कार्यालय, मुखेड येथे भेटतील असे सांगितले.
त्यानंतर आम्ही तक्रारदारास सापळा पथक, दोन्ही पंच व तक्रारदार असे षासकीय वाहनाने लाच मागणी पडताळणी करीता लागणारे सर्व साहित्यासह लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नांदेड येथून मुखेड करीता रवाना होवून नांदेड ते मुखेड रोडलगत स्थित असलेली दर्गाह परिसरात जावून सुरक्षीत स्थळी थांबलो. तेथे आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकाची एकमेंकाना ओळख करून दिली. तसेच तक्रारदार यांनी आमच्याकडे नोंदविलेल्या लाचेच्या तक्रारी बाबत थोडक्यात हकीकत सांगून दोन्ही पंचाना तक्रार वाचण्यास दिली. पंचानी तक्रार वाचून त्यावर सहया केल्या.
त्याठिकाणी आमचे सुचनेवरुन पोका◌ॅ/सय्यद खदिर यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना डिजीटल व्हा◌ॅईस
रेका◌ॅ
ड
र, मेमरी कार्ड बाबत थोडक्यात माहिती देवून आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डरव्दारे एव
त्यानंतर आम्ही परत एकदा तक्रारदार यांना विचारणा केली की, लोकसेवक खुडे व लोकसेवक सय्यद इम्रान हे कुठे भेटतील, तेव्हा त्यांनी कळविले की, ते दोघेजण हे भुमी अभिलेख कार्यालय, मुखेड येथे भेटतील. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना लाच मागणी पडताळणी करण्याचा र्निणय घेवून पंच क्रमांक 1 व 2 यांची जबाबदारी निष्चीत केली.
त्यानंतर तक्रारदार सुर्यकांत इंद्राळे व पंच क्र. 1 विरेन धनमने असे दोघांना तक्रारदार यांचे जवळील मोटार सायकल क्रमांक एम.एच. 26 यु 7178 ने वेळ 12.30 वा. भुमी अभिलेख कार्यालय, मुखेड येथे लोकसेवक खुडे व लोकसेवक सय्यद इम्रान यांची भेट घेण्यासाठी डिजीटल व्हा◌ॅईस
रेका◌ॅ
ड
र चालु करून तक्रारदार यांचे गळयात लटकावुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणा वरून रवाना केले. वेळ 13◌ः00 वाजत
त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच क्र. 01 यांना पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितले की, खुडे साहेब हे उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, मुखेड येथील तांत्रिक विभाग, हा◌ॅल क्रमांक 2 मध्ये हजर होते. त्या ठिकाणी तक्रारदार हे खुडे साहेबांना भेटून षेतमोजणी अहवाल पाठविणे संबधाने चर्चा केली, त्यावेळी खुडे साहेब यांनी सय्यद इमरान यांना त्यांचे स्वतःचे मोबाईल वरुन फोन करून स्पीकर आ◌ॅन करून चर्चा केली की,
ते सव्र्हे नंबर 61 वाले आलेत, माझेसमोर आहेत, आता त्यांना आपण 15 म्हणलो होते, त्या दिवषी, ते द्यायला तयार आहेत, त्यामध्ये त्यांना त्यांचे पुर्णच काम ना ? त्यावर सय्यद इमरान यांनी म्हणाले की, पुर्ण ! त्यावर खुडे म्हणतो की, म्हणजे ते आता षेवटी हद्दी वगैरे दाखवण्या सहित, त्यावर सय्यद इम्रान म्हणतो की, ते नंतर येईल ना, ते पुर्णच काम म्हणून आपण गुत्ता घ्यायचा का ? त्याच्यामध्ये ज्यावेळेस येईल त्यावेळेस राहिल, आपण राहतो, न राहतो काय सांगता येते का ? ते नंतरचे नंतर राहतेत. त्यावर खुडे म्हणतो की, बंर मग, आता समजा त्यांनी एक दोन महिन्याच फायनल करून घ्यायच प्रयत्न केला तर आपण तेव्हा राहतोच, त्यावेळेस आपण तर त्यांन हे करू ना... ? तेव्हा लोकसेवक इम्रान म्हणतो की, हो.... हो असे म्हणतो. त्यावेळी खुडे म्हणतात की, आपण राहिलात तर काम करून देवू तसेच त्यानंतर म्हणतात की, चालते सांगतो त्यांना आता जे काम हाय.
त्यानंतर खुडे यांनी तक्रारदार यांना सांगितले की, ते आहे, तो पर्यत तुमचे काम करून देणार आहे, ते निघून गेले किंवा जास्त वेळ लागला, तर त्याबाबत ते काही सांगता येत नाही. तुम्हाला नंतर 1 ते 2 हजार लागतील, नंतर आताच्या ऐवढे 10 ते 15 हजार रूपये लागणार नाही. त्यांच बोलण्याचा भाव ऐकूण घ्या...... मी त्यांना म्हणलं तसं नाही, आपणच इथं राहणार आहोत. तुम्ही पण राहणार आहोत, मी पण राहणार आहे, झालं तर आपण याच करून देवू म्हणलं, हो ना, काही हरकत नाही, करून देवू म्हणले.
त्यानंतर तक्रारदार यांनी खुडे यांना म्हणाले की, आमच्या घरचे काय म्हणालते.... त्यान जर 15 मागत असतील तर 10 द्या...... 5 मागल्या कामासाठी ठेवा.... त्यावर खुडे म्हणतात की, कसं आहे, दोघं तिंघ मागणारे असतात. त्या हयाला बी त्या साहेबाला थोडे तोंडावर फेकावे लागते असे म्हणा◌ाले.
तेव्हा तक्रारदार खुडेला पुन्हा म्हणतात की, तुम्ही हवाला घ्या, आणि काम करून द्या, तेव्हा खुडे बोलतात की, तुम्ही

Scanned with OKEN Scanner

आता 15 द्या, बाकीचं मी करून घ्यायला लावतो,, मी आहे, दोन ते तीन वर्श इथे तुमचे काम करून देतो असे म्हणाले.
त्यानंतर आम्ही तक्रारदार व लोकसेवक खुडे यांचे भेटी दरम्यान डिजीटल व्हॉईस
रेकॉ
ड
र मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यावरून तक्रारदार, पंच क्र 1 हे सांगत असलेली हकीकत व डिजीटल व्हॉईस तरी लोकसेवक खुडे यांनी लोकसेवक सय्यद इमरान यांचेकरीता तक्रारदार सुर्यकांत इंद्राळे यांचे षेतमोजणी अहवाल पाठविण्यासाठी 15,000/- रूपयाची लाचेची मागणी करून ती स्वतः स्वीकारण्याचे तयारी दर्षविली. नमुद लाच मागणीस लोकसेवक सय्यद इमरान यांनी झालेल्या फोनवरील संभाशणा वरून सहमती दर्षविल्याचे निश्पन्न झाल्याने लोकसेवक खुडे व लोकसेवक सय्यद इमरान यांचे विरूध्द लाच स्विकृती सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले.
त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचेकडील 15,000/- रुपये रक्कम (ज्यात 500/- रुपये दराच्या 30 भारतीय चलनी नोटा) पंचासमक्ष हजर केल्या. त्या नोटांचा तपषिल एका कागदावर नोंदवून घेतला. त्यानंतर पोहेकॉ/बालाजी मेकाले यांनी लाच रक्कम 15,000/- रूपये रकमेच्या भारतीय चलनी नोटांना अॅंथ्रासिन पावडर लावुन तक्रारदार यांचे पॅन्टच्या वॉच पाॅकीट मध्ये अलगद ठेवून दिली.
त्यानंतर तक्रारदार यांचे गळ्यात डिजीटल व्हॉईस
रेकॉ
ड
र चालू करून गळ्यात अडकावून पंच क्र. 1 विरेन धनमने यांच्यसोबत तक्रारदार यांचे मोटार सायकलने उप अधीक्षक, भुमी त्यानंतर आम्ही लोकसेवक पंच क्रमांक 1 यांना विचारणा केली की, तक्रारदार यांचेकडून स्वीकारलेली लाचेची रक्कम कुठे ठेवली आहे ? त्यावर त्यांनी सांगितले की, नमुद रक्कम लोकसेवक खुडे यांनी हातात घेवून टेबलाच्या खाली ठेवलेली आहे. त्यावेळी आम्ही लोकसेवक बसलेल्या टेबलची पाहणी केली असता टेबल्याच्या खालच्या बाजूच्या कप्प्यावर अॅथाॅरसिन पावडरयुक्त लाचेची रक्कम मिळून आली. ती पंचाकरवी हस्तगत करून ताब्यात घेवून नोटांचे क्रमांकाची पडताळणी केली.
लागलीच लोकसेवक खुडे यांचे दोन्ही हाताला अॅंथ्राॅसीन पावडर आहे याची अल्ट्राव्हायलेट लॅम्प मध्ये पाहणी केली असता त्यांचे उजव्या व डाव्या हाताच्या तळहातावर तसेच बोटावर अॅंथ्रासिन पावडरची चकाकी ठिकठिकाणी दिसून आली.
त्यानंतर आम्ही पंच क्रमांक 1 यांना सापळा कारवाई दरम्यान काय घडले अषी विचारणा केली असता, त्यावर पंच क्रमांक 1 यांनी आम्हास कळविले की,
मी व तक्रारदार सुर्यकांत इंद्राळे असे भुमी अभिलेख कार्यालय, मुखेड येथील तांत्रिक विभाग, हाॅल क्रमांक 2 येथे गेलो. तेथे लोकसेवक खुडे हे बसलेले होते. तेव्हा तक्रारदार यांनी लोकसेवक खुडे यांना म्हणाले की, माझेसाठी ही रक्कम मोठी आहे, कृपया जबाबदारी तुमची, त्यावर लोकसेवक खुडे म्हणाले की, नाही नाही, मी त्यांना सांगितलो, त्यांना सगळं सांगितलोय, नंतर बोललो देखील, ते नांदेड ला गेले, तुम्ही कसलीही काळजी करू नका, त्यांना फोन लागत नाही, ते उद्या तर येणारच आहे असे म्हणाल्याने तक्रारदार यांनी त्यांचे जवळील ठेवलेली अॅंथ्रासिन पावडरयुक्त 15,000/- लाचेची रक्कम लोकसेवक खुडे यांचे समोर धरली आणि म्हणाले की, हे 15 हजार आहेत, मोजून घ्या, त्यावर खुडे म्हणतात की, ओके, ओके असे म्हणून तक्रारदार यांचेकडून 15,000/- रूपये स्वीकारले आहे. त्यानंतर लोकसेवक खुडे यांना पुढील कारवाई करीता ताब्यात घेवुन सापळा पथकासह पोलीस स्टेषन मुखेड करिता रवाना झालो.
आरोपी लोकसेवक क्रमांक 1) विवेकानंद पांडूरंग खुडे, वय 35 वर्शे, व्यवसाय-नौकरी, पद: षिपाई, नेमणूक: भुमी अभिलेख कार्यालय, मुखेड, रा. मु.पा. खुडेवाडी ता. कंधार, जि. नांदेड यांनी तक्रारदार सुर्यकांत इंद्राळे यांचे पत्नीचे नावे असलेले मौ. मुखेड येथील गट क्रमांक 61 मधील षेताचे मोजणी करून पुढील अहवाल मा. न्यायालयात पाठविण्याकरीता आरोपी लोकसेवक क्रमांक 2) सय्यद इमरान सय्यद इकबाल, पद निमतानदार, नेमणूक भुमी अभिलेख कार्यालय, मुखेड यांचेकरीता व स्वतः करीता 15,000/- रूपयाची लाचेची मागणी करून सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचेकडून अॅंथ्रासिन पावडरयुक्त 15,000/- रूपये लाचेची रक्कम स्वतः स्वीकारल्याचे निश्पन्न झाले. तसेच सदर लाच मागणी कारवाई मध्ये आरोपी लोकसेवक सय्यद इमरान सय्यद इकबाल यांनी फोनवरील संभाशणात सहमती दर्षविल्याचे निश्पन्न झाले आहे. म्हणून यातील आरोपी लोकसेवक क्रमांक 1 व 2 यांचे विरूध्द कलम 7, 12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे माझी कायदेषिर फिर्याद

Scanned with OKEN Scanner

 *Date.02...

आहे. ही फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

CHITAMBAR Shankarrao KAMTHEWAD(I (Inspector)) / POBN84808

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद):

No.(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

Scanned with OKEN Scanner

पोलीस ठाणे अंमलदार
पो स्टे मुखेड जि नांदेड

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): CHITAMBAR Shanka

Rank(पद): I (Inspector)

No.(सं.): POBN84808

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन, मुखेड * ता. मुखेड जि. नांदेड *

Scanned with OKEN Scanner

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the (If known / seen)**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

S.No.(अ.क्र.)	**Sex** (लिंग)	**Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष)	**Build** (बांधा)	**Height (cms.)** (उंची(सें. मी.))	**Complexion** (रंग)	**Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा)
1	2	3	4	5	6	7
1	पुरुष					चेचक के दाग: NO
2	पुरुष					चेचक के दाग: NO

Deformities/ Peculiarities	**Teeth** (दात)	**Hair** (केस)	**Eyes** (डोळे)	**Habit(s)** (सवयी)	**Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी)
8	9	10	11	12	13

Language /Dialect (भाषा / बोलीभाषा)	**Place Of** (का स्थान)					**Others** (इतर)
	Burn Mark (भाजल्याच्या खुणा)	**Leucoderma** (कोड)	**Mole** (तिळ)	**Scar** (व्रण)	**Tattoo** (गोदण)	
14	15	16	17	18	19	20

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

Scanned with OKEN Scanner